**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यार्थी विकास विभागाद्वारे विद्यार्थी हितार्थ विविध योजनांसाठी आवेदनपत्र आमंत्रित

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती योजना, स्व.प्रा. रामप्रकाश शामलाल राठी स्मृति शिष्यवृत्ती योजना, संत गाडगे बाबा विद्याधन योजना, संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना व संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना सुरु करण्यात आल्या असून त्यासाठी नियम तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध योजनांबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांच्या प्रमुखांना विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी पत्र पाठवून कळविले आहे.

प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठ राजपत्र व नियमाचे अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी आवेदनपत्र भरुन घेवून प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन त्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक यांचेकडे विहित मुदतीत पोहोचेल या बेताने पाठवावयाचे आहेत. या योजनेसंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर 'स्टुडन्ट डेव्हलपमेन्ट' याशिर्षातील 'लेटर' या उपशिर्षामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक विभागांचे प्रमुख यांचेशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी कळविले असून काही अडचण असल्यास त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९५०३४५७५४६ वर संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २७/०७/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी